

# परमेश्वराचे संदेश

## अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

एप्रिल २०२५

वर्ष ५० अंक ०४



श्रीमाताजी व श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

भलेही, समजा तुम्ही सुरुवातीला अगदी दृढ निर्णय घेतलेला नसेल, पण विश्वाच्या इतिहासातील एखाद्या असाधारण क्षणी, म्हणजे जेव्हा ईश्वरी कृपा उपस्थित आहे, ती या भूतलावर आविष्कृत झाली आहे अशा क्षणी, जीवित असण्याचे सद्‌भाग्य जर तुम्हाला लाभलेले असेल तर, पुन्हा एकदा, काही विशिष्ट अपवादात्मक क्षणी, थेट ध्येयाप्रत घेऊन जाईल अशी, अंतिम निवड करण्याची संधी तुम्हाला प्रदान केली जाईल.

– श्रीमाताजी (CWM 12 : 349)

*

## परमेश्वराचे संदेश

संपादकीय....................................................०२
श्रीअरविंदांची स्वाक्षरी..........................................०३
श्रीमाताजींची स्वाक्षरी..........................................०४
प्रार्थना.......................................................०७
प्रयोजन.......................................................११
स्वातंत्र्य .....................................................१४
अभ्यास.......................................................१८
प्रकाशसूत्रे ....................................................२७
श्रीअरविंद ....................................................२९
श्रीमाताजी ....................................................३४
विजय .........................................................३७

---

## संपादकीय

व्यक्ती जेव्हा एखाद्या कागदपत्रावर स्वाक्षरी करते तेव्हा त्यामध्ये जे लिहिलेले आहे ते त्या व्यक्तीला मान्य आहे, असा त्याचा अर्थ होतो. जी व्यक्ती स्वाक्षरी करत आहे, त्या व्यक्तीच्या नावामध्ये एक विशिष्ट शक्ती समाविष्ट असते आणि ती स्वाक्षरी म्हणजे जणू त्या शक्तीचे मूर्त रूप असते.

श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी जेव्हा स्वाक्षरी केलेली असते तेव्हा ती केवळ एक औपचारिकता नसते. ती स्वाक्षरी म्हणजे पृथ्वीला आणि मानवजातीला दिलेला एक विशेष आशीर्वादच असतो. ती ईश्वरी कृपेची कृती असते. श्रीमाताजींनी आणि श्रीअरविंदांनी वेळोवेळी त्यांच्या स्वाक्षरीनिशी जे संदेश दिलेले आहेत त्यातील काही निवडक संदेश ‘अभीप्सा’ मासिकाच्या या अंकामध्ये समाविष्ट करत आहोत.

संपादक, अभीप्सा मासिक


**


---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

# श्रीमाताजींची स्वाक्षरी




(श्रीमाताजी त्यांच्या स्वाक्षरीचा अर्थ येथे उलगडवून दाखवत आहेत.) स्वाक्षरीचे हे चित्रात्मक प्रतिनिधित्व आहे. 'ईश्वरी शांतीचा पक्षी या पृथ्वीवर अवतरत आहे,' असा याचा अर्थ आहे. त्याचे पंख पृथ्वीच्या दिशेने झुकलेले आहेत आणि तो पृथ्वीकडे झेपावत आहे. पंखांचा हा कोन लक्षात येतोय का? आणि तो पृथ्वीवर कसा उतरून येत आहे,

लक्षात येतंय? तो ईश्वरी शांती घेऊन येत आहे. तो ईश्वराचा शांतिदूत आहे. ईश्वरी शांतीचा पक्षी या पृथ्वीवर अवतरत आहे, आले लक्षात?

आता हा पक्षी माझ्या स्वाक्षरीशी कसा मिळताजुळता आहे, ते सांगते. असे पाहा, ही पक्षाची शेपटी आहे. येथे शेपटीची दोन टोकं दिसत आहेत. शेपटीची ही दोन टोकं आणि हा एक पंख, असे मिळून पक्षाचा एक भाग तयार झाला आहे. आणि आता हा दुसरा पंख पाहा; खूप मोठे पंख आहेत त्याचे. या दोन बिंदुंनी दोन डोळे दाखविले आहेत. आणि हे त्याचे डोकं.


हा पक्षी खूप दूरवरून येताना दिसत आह आणि त्यामुळे त्याचे चमकणारे डोळे तेवढे दिसत आहेत, त्याचे बाकी तपशील इथे दिसत नाहीयेत. त्याचे पंख खूप मोठे आहेत आणि ते असे एका बाजूला झुकलेले असल्यामुळे, त्याचे शरीर दिसत नाहीये. त्या मोठ्या पंखांच्या पाठीमागे त्याचे शरीर झाकले गेले आहे. दूरवरून त्याचे दोन डोळे आणि त्याची चोच तेवढीच काय ती दिसत आहे. डोळे चकाकत आहेत; डोळ्यांमध्ये आत्म्याचे प्रतिबिंब पडलेले असते आणि म्हणून ते महत्त्वाचे असतात. आता असे पाहा की, ही शेपटी एका पंखाला जोडलेली आहे आणि हा इथे दुसरा पंख आहे. आणि हे दोन बिंदू म्हणजे त्याचे डोळे आहेत.

ईश्वरी शांतीचा पक्षी या पृथ्वीवर उतरून येत आहे, याचे हे प्रतीकात्मक चित्र आहे. प्रत्येक वेळी हा संपूर्ण पक्षी काढत बसण्यापेक्षा मी, त्या पक्षाचे प्रतीक म्हणून ही प्रतीकात्मक स्वाक्षरी तयार केली आहे. पृथ्वीवर झेपावणारा पक्षी यामध्ये सुस्पष्टपणे दिसत आहे. आत्ता तो खूप दूर अंतरावर आहे, पण एके दिवशी तो पृथ्वीवर अवतरेल. आणि तेव्हा पृथ्वीवर ईश्वरी शांती अवतरलेली असेल. माझ्या स्वाक्षरीचा हा अर्थ आहे.

या पृथ्वीवर ईश्वरी शांती आणण्यासाठी तो एका वेगळ्या जगामधून आला आहे.

– श्रीमाताजी (Mona Sarkar in Luminous Notes)

*


1947

At the very moment when everything seems to go from bad to worse, it is then that we must make a supreme act of faith and know that the Grace will never fail us.

M.

## ईश्वरी कृपाछत्र

जेव्हा परिस्थिती वाईटाहून अधिक वाईट होत आहे असे वाटते, तत्क्षणी आपण श्रद्‌धेची परमोच्च झेप घेतली पाहिजे आणि ईश्वराची कृपा आपली कधीच वंचना करणार नाही, हे आपण जाणून असले पाहिजे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 169)

**

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# सावित्रीवरील चित्रप्रकल्प

हुता हिंडोचा या पूर्व आफ्रिकेतील एक साधिका होत्या. त्यांचे मूळ नाव सविता देवजीभाई हिंडोचा. परंतु त्यांना श्रीमाताजींनी 'हुता' हे नाव दिले. याचा अर्थ 'जिने आपले जीवन समर्पित केले आहे अशी' असा होतो.

हुता या श्रीमाताजींच्या निकटवर्ती अनुयायांपैकी एक होत्या. हुता या चित्रकलेच्या बाबतीत अगदीच अनभिज्ञ होत्या. पण त्यांच्या अंगी चित्रकलेचे कौशल्य असल्याचे श्रीमाताजींनी ओळखले. हुता या गतजन्मामध्ये फ्रान्समधील एक पुरस्कारप्राप्त अशा विख्यात चित्रकार मॅडम विग-लेब्रन होत्या, हे श्रीमाताजींच्या अंतर्दृष्टीला दिसले होते.

१९५६ साली श्रीमाताजींनी हुता यांना श्रीअरविंद लिखित 'सावित्री' महाकाव्य भेट दिले. एवढे अवघड महाकाव्य आपल्याला कसे काय समजणार असे त्यांना वाटू लागले. त्याच रात्री त्यांना स्वप्नामध्ये असे दिसले की, श्रीमाताजी स्वतः सावित्रीमधील काही काव्यपंक्ती आपल्याला वाचून दाखवीत आहेत. दुसऱ्या दिवशी ही हकिकत त्यांनी श्रीमाताजींना सांगितली, तेव्हा श्रीमाताजींनी ते स्वप्न खरे असल्याचे सांगितले.

स्वतः उत्तम चित्रकार असलेल्या श्रीमाताजींनी हुता यांना ब्रश, रंग इत्यादीसंबंधीचे बारकावे शिकवले. पुढे शिक्षणासाठी हुता परदेशी गेल्या. तेथून परतलेल्या हुता यांची चित्रं काढण्याची पुरेशी तयारी झाली असल्याचे पाहून, स्वतः श्रीमाताजी हुता यांच्या समवेत ध्यानाला बसू लागल्या. सावित्रीमधील काव्यपंक्तींचा अनुभव त्या हुता यांना ध्यानावस्थेत देत असत. चित्रं काढण्यासाठी मार्गदर्शक होतील अशी स्केचेस श्रीमाताजी हुता यांना काढून देत असत आणि त्याच्या आधारे हुता, श्रीमाताजींच्या मार्गदर्शनाने चित्रं काढत असत. अशा रितीने ऑक्टोबर १९६१ ते फेब्रुवारी १९६७ या कालावधीत हुता यांनी सावित्री महाकाव्यावर आधारित एकूण ४७२ चित्रं काढली. ऑरोविलमध्ये 'सावित्रीभवन'च्या दालनात ही सर्व चित्रं कायमस्वरूपी प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. हा संपूर्ण प्रकल्प 'मेडिटेशन्स ऑन सावित्री' या नावाने ओळखला जातो. त्यातील श्रीमाताजींच्या सहभागामुळे या प्रकल्पास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

– आधारित (My Savitri Work with The Mother by Huta)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १७ नोव्हेंबर २००५

श्रीमाताजींच्या सातत्यपूर्ण उपस्थितीची जाणीव ही अभ्यासानेच होते; साधनेमध्ये यशस्वी होण्यासाठी दिव्य कृपेची आवश्यकता असते, पण अभ्यासामुळे कृपेच्या अवतरणाची तयारी होते. तुम्ही बाह्य गोष्टींमध्ये जीवन न जगता, अंतरंगात वळण्यास शिकले पाहिजे; मन शांत करा आणि श्रीमाताजींचे तुमच्यामध्ये जे कार्य चालू आहे त्याची जाणीव तुम्हाला व्हावी अशी अभीप्सा बाळगा.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 172)

*

### २४ नोव्हेंबर २००५

जो जीव स्वतःस ईश्वराप्रति समग्रतया अर्पण करतो, त्याला ईश्वरसुद्धा त्याचे सर्वस्व प्रदान करतो.

जो स्वतःची संपूर्ण प्रकृती अर्पण करतो त्याला आत्म्याचा शोध लागतो.

जो सर्वस्व अर्पण करू शकतो, त्याला सर्वत्र सर्वात्मक ईश्वराचा आनंद अनुभवास येतो.

– श्रीअरविंद (CWSA 23-24 : 110)

*

### ०५ डिसेंबर २००५

'शाश्वत' हे मर्त्य जिवाच्या हृदयामध्ये गुप्तरूपाने वसलेले असते. तुमच्या आत्म्याच्या दालनामध्ये तो ईश्वर गुप्तरूपाने वसलेला असतो. तिथे एक प्रकाश उजळलेला असतो, कोणतीही वेदना किंवा कोणतेही दुःख तिथे प्रवेश करू शकत नाही.

– श्रीअरविंद (CWM 33-34 : 442)

*